| MHNS050013822025 | दाखल दिनांक | : | १९.०३.२०२५ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २२.०३.२०२५ |
| | न्यायनिर्णय दिनांक | : | २२.१२.२०२५ |
| | कालावधी | : | ००व. ०९म. ०३दि. |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नाशिकरोड, ता. जि. नाशिक**
**यांचे न्यायालयात पिठासीन अधिकारी (एन. के. मेश्राम)**

**नियमित फौजदारी खटला क्र. २०४/२०२५** **निशाणी क्र. १०**

सरकार तर्फे
पोलीस स्टेशन अधिकारी,
नाशिकरोड पोलीस स्टेशन,
नाशिक ... **अभियोग पक्ष**

**-विरुध्द-**

१. बिलाल अली हुसेन शेख
वय - २५ वर्षे
रा. - रुम नं.४०८, गल्ली नं.०३,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर,
कळवा, मुंबई ०५.
२. तोफिक अब्दूल हुसेन खान
वय - २५ वर्षे
रा. - अंधेरी वेस्ट, कॉलेज दिलपारी रोड
मोहम्मद चाळ, मुंबई. ... **आरोपी**

**आरोप :- भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) सह कलम ३(५) अन्वये**

---

अभियोग पक्षातर्फे :- सहा. सर अभियोक्ता श्रीमती. आर. एन. चव्हाण
आरोपीतर्फे विधीज्ञ :- श्री. पी. पी. ताजनपुरे

---

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांक :-२२.१२.२०२५)

प्रस्तुतचा खटला हा भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) सह कलम ३(५) अन्वयेच्या दंडनिय अपराधाकरिता आरोपीविरुध्द चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे-**

२. फिर्यादी श्रीहरी राजलींगम गुंटुका (न्यायाधीन बंदी क्र.४८३७/२०२४) यांनी फिर्याद दिली की, दि. ०४.११.२०२४ रोजी सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास फिर्यादी मध्यवर्ती जेल नाशिकरोड येथील यार्ड क्र.०१/०८ चे फाटकाजवळून आतून फिरत असतांना आरोपीने इतर आरोपींसह संगनमताने फिर्यादीच्या पाठीमागून येवून दगडाने फिर्यादीच्या डोक्यात मारुन दुखापत केली तसेच फिर्यादीस हाताचापटीने मारहाण केली.

३. सदर फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन अंमलदार नाशिकरोड, नाशिक यांनी प्रथम गु.र.नं. ५९७/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) सह कलम ३(५) अन्वयेच्या अपराधांकरिता गुन्हा नोंदविला. त्यानंतर आरोपीस अटक केली. तपासी अंमलदार यांनी घटनास्थळाचा पंचनामा दोन पंचासमक्ष केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपासाअंती सर्व आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. मी सर्व आरोपी क्र.१ विरुध्द नि.क्र.८ वर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) या गुन्ह्याकरिता दोषारोप निश्चित करून त्यांना वाचून व समजावून सांगितले. आरोपी क्र.१ याने सदर दोषारोप मान्य करुन त्याने त्याची शिक्षा इतर शिक्षेसोबत चालविण्याची मागणी केली. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी जास्तीत जास्त शिक्षा देण्याची मागणी केली. आरोपी हा दुस-या गुन्ह्यात जन्मठेपेची शिक्षा भोगत असून त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी दिसून येते. परिणामतः मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे -

## आदेश

१) आरोपी क्र.१ बिलाल अली हुसेन शेख यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(२) अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१), ११५(२) अंतर्गत दोषी ठरविणेत येत आहे.

२) आरोपी क्र.१ बिलाल अली हुसेन शेख यास भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११८(१) या गुन्हयासाठी तीन वर्षांची साधी कैदेची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

३) आरोपी क्र.१ बिलाल अली हुसेन शेख यास भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ११५(२) या गुन्हयासाठी एक वर्षांची साधी कैदेची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

४) वरील दोन्ही शिक्षा ह्या भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २५ अन्वये एकत्रितपणे देण्यात येते.

५) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४६८ अन्वये आरोपीने भोगलेल्या स्नाानबध्दतेचा कालावधी हा वरील करावासाच्या शिक्षेतून वजावट करावा.

६) आरोपी क्र.२ तोफिक अब्दूल हुसेन खान याच्याविरुध्द खटला प्रलंबित ठेवण्यात येतो.

७) न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस मोफत पुरविण्यात आली.

दिनांक: २२/१२/२०२५
स्थळ: नाशिकरोड

**(एन. के. मेश्राम)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. २ नाशिकरोड,
ता. जि. नाशिक.

आरोपी क्रमांक १ मोफत नक्कल मिळाली.

BILAL दि 22-12-2025